# ग्रामीण साहित्य आणि संस्कृती



डॉ. संतोष चतुर
डॉ. गोपाल ढोले

ग्रामीण साहित्य आणि संस्कृती
डॉ. संतोष चतुर ■ डॉ. गोपाल ढोले

## संपादक परिचय



**डॉ. संतोष विष्णू चतुर**
एम.ए. (मराठी, समाजशास्त्र, राज्यशास्त्र), बी.एड., पीएच.डी., नेट.
सहयोगी प्राध्यापक, मुंगसाजी महाराज महाविद्यालय, दारव्हा, जि. यवतमाळ

प्रकाशित ग्रंथ : मराठी व्रतकथा : आकलन व समीक्षा
पुरस्कार : १) विद्याभूषण पुरस्कार, २) सेवा गौरव पुरस्कार
संशोधन कार्य : विविध चर्चासत्र, परिषद, नियतकालिके व पुस्तकांमधून ५७ पेक्षा अधिक संशोधनपर लेखांचे वाचन तथा प्रकाशन.



**डॉ. गोपाल जनार्दन ढोले**
एम.ए. (मराठी), बी.एड., पीएच.डी., नेट.
प्राचार्य, डॉ. गोपालराव खेडकर महाविद्यालय, गाडेगाव (तेल्हारा), जि. अकोला

प्रकाशित ग्रंथ : १) मानवाधिकार : सद्यस्थिती (संपादित), २) दलित आत्मकथने : चिंतन आणि चर्चा (संपादित), ३) विठ्ठल : शोधाची नवी रूपे, ४) [illegible] प्रवाह
पुरस्कार : १) विद्याभूषण पुरस्कार, २) अक्षर वैदर्भीला राज्यस्तरीय उत्कृष्ट साहित्य [illegible] पुरस्कार, ३) [illegible] पुरस्कार
संशोधन कार्य : विविध चर्चासत्र, परिषद, नियतकालिके व पुस्तकांमधून संशोधनपर लेखांचे वाचन तथा प्रकाशन.

Prashant
मराठी साहित्य ₹ 395
ISBN 978-93-[illegible]

**ग्रामीण साहित्य आणि संस्कृती**

© प्रा. डॉ. संतोष चतुर

**। प्रकाशक । मुद्रक**
रंगराव पाटील
प्रशांत पब्लिकेशन्स
3, प्रताप नगर, श्री संत ज्ञानेश्वर मंदिर रोड,
नूतन मराठा महाविद्यालयाजवळ,
जळगाव 425001.

**। दूरध्वनी । वेब । ईमेल**
0257-2235520, 2232800
www. prashantpublications. com
prashantpublication. jal@gmail. com

**। आवृत्ती । आयएसबीएन । किंमत**
सप्टेंबर, 2021
978-93-91391-69-0
₹ 395/-

**। मुखपृष्ठ । अक्षरजुळवणी**
प्रशांत पब्लिकेशन्स

*e-Books are available online at* www. prashantpublications. com
**Prashant Publications** *app for e-Books*
kopykitab. com • amazon. com • play. google. com

*या पुस्तकातील कोणताही मजकूर, कोणत्याही स्वरूपात वा माध्यमात पुर्नप्रकाशित अथवा संग्रहित करण्यासाठी लेखक/प्रकाशक दोघांचीही लेखी पूर्वपरवानगी घेणे बंधनकारक आहे. तसेच मजकूराची जबाबदारी ही सर्वस्वी लेखकाची राहील. लेखकांनी मांडलेल्या सर्वच मतांशी संपादक सहमत असतील असे नाही.*

## : संपादकीय :

ग्रामीण भागातील शिकलेल्या पिढीला १९६० च्या आसपास सांस्कृतिक भान आले. आपण अनुभवलेले अनुभव, अनुभवत असलेले खेडे आणि ते जीवन साहित्याचा विषय होऊ शकते याची त्यांना जाणीव झाली. आपण वाचतो ते प्रस्थापित मराठी साहित्य समग्र जीवनाचे चित्रण करीत नाही. खरेतर खेड्यात राहणारी माणसे आणि शेती, निसर्ग, पशुपक्षी, पिके, जमिनीचा प्रकार, जलसंधारण यांचा अतूट संबंध असतो. ग्रामीण विभाग म्हणजे केवळ खेडी असलेला विभाग नव्हे, तर निसर्गाच्या साधनसंपत्तीवर आणि शेतीनिष्ठ जीवन पद्धतीवर ज्यांची उपजीविका चालते असे खेड्यातील, खेड्याच्या भोवतीचे, रानावनातील, भटके असे सर्व लोक जेथे राहतात असा सर्व विभाग होय. या विभागातून उपजीविकेसाठी शहरात जाणारे व तेथे काम धंदा करणारे परंतु मूळच्या आपल्या खेड्याची प्रत्यक्ष किंवा मानसिक पातळीवर संबंध ठेवणारे जनसामान्य 'ग्रामीण' या संज्ञेत समाविष्ट आहेत.

ग्रामीण माणसाचे त्याच्या काळ्या आईवरील, पिकावरील, झाडावरील, पशुधनावरील, घनिष्ठ प्रेम आणि जिव्हाळा लक्षणीय असतो. ग्रामीण जीवन काबाडकष्टांचे, हालअपेष्टांचे असते. तरीपण त्यांच्या जीवनात आनंदाचे क्षण सुद्धा असतात. दुधाच्या सायीपासून तर शेणाच्या पोवट्यापर्यंत त्यांचे भावबंध गुंतलेले असतात. प्रतिकूल परिस्थितीतही जगण्याचे चिवट वळ त्यांनी आत्मसात केलेले असते. शेतकरी-शेतमजूर, अलुते-बलुते यांचे परस्पर संबंध घट्ट आवळले गेले आहेत. यांत्रिकीकरणामुळे जुनी गावगाडा पद्धती मोडकळीस आली आहे. पण ती संपूर्ण नष्ट झाली नाही. शेती, पिके, उत्पादन पद्धती, अतिवृष्टी, अनावृष्टीचा ग्रामीण जीवनावर होणारा परिणाम यामुळे रावाचा रंक आणि रंकाचा राव होतो. ग्रामीण माणसाचा विचार शेती आणि त्याचे पशुधन वगळून करताच येत नाही. शेती आणि पशुधन यांची कोणत्याही कारणाने परवड होऊ नये असे शेतकऱ्यांना वाटते.

'बदलत्या काळानुसार शेतीनिष्ठा बदलत आहे. शहराजवळील शेतकरी शेतीचे प्लॉटिंग करून शेती विकत आहेत. शेती विकणाऱ्या शेतकऱ्यांच्या मनातील ताण-तणाव, त्यांची आर्थिक स्थिती आपण लक्षात घेतली पाहिजे. अनावृष्टी, अतिवृष्टी, गारपीट, पिकांवरील कीड यासारख्या निसर्ग

- ग्रामीण सामाजिक वास्तव ........................................ ९७
  डॉ. आर. व्ही. मोरे
- ग्रामीण साहित्यातील सामाजिक वास्तवाचे स्वरूप : एक आढावा ........................................ १०२
  प्रा. सिद्धार्थ इंगोले
- ग्रामीण कादंबरीतील स्त्री ........................................ १०९
  डॉ. अनुराधा वसंत गुजर
- आजचे ग्रामीण वास्तव ........................................ ११३
  प्रा. डॉ. नागोराव कों. सोरे
- ग्रामीण जीवनातील स्त्रियांच्या समस्या ........................................ ११८
  प्रा. डॉ. संगीता पुईखेडकर
- ग्रामीण जीवन व प्रसारमाध्यमे ........................................ १२४
  प्रा. सुरेश किसनराव इंगळे
- राष्ट्रसंतांचा ग्रामरक्षण विषयक विचार ........................................ १३०
  प्रा. डॉ. संतोष विष्णू चतुर
- भारतीय शेतीचे महत्त्व ........................................ १३६
  डॉ. एन. आर. भिंगारे
- ग्रामातील आर्थिक जीवन ........................................ १४०
  प्रा. डॉ. रामधन हिरे
- ग्रामजीवनावर तंत्रज्ञानाचा परिणाम ........................................ १४४
  डॉ. गव्हराम नाना पोटे
- ग्रामीण जीवन आणि जलसमस्या ........................................ १५०
  डॉ. मनीष नरेश मोहरील
- ग्रामीण साहित्य आणि जागतिकीकरण ........................................ १५६
  सुधीर बा. सांगोले
- जागतिकीकरण आणि ग्रामीण साहित्य ........................................ १६०
  प्रा. सुनिल रामराव काकडे
- ग्रामीण कृषी व शेत मजुरांची उदासीनता ........................................ १६५
  डॉ. शंकर मारोती सावंत
- नव्वदोत्तर ग्रामीण कादंबरीतील शेतकरी जीवन ........................................ १७४
  प्रा. डॉ. कल्पना त्र्यंबक मेहेर
- 'दगडी मक्ता' या ग्रामीण कादंबरीतील पाथरवटांचा जीवनसंघर्ष ........................................ १८०
  डॉ. सुवर्णा गाडगे
- डॉ. सदानंद देशमुख यांच्या कादंबऱ्यातून व्यक्त होणाऱ्या कृषिनिष्ठ ग्रामीण संवेदनांची अभिव्यक्ती ........................................ १९०
  निलेश गायकवाड
- ग्रामीण कांदबरीतील जननिष्ठ जाणिवांचा ज्वलंत व प्रभावी आविष्कार ........................................ १९७
  डॉ. पंढरी डोईफोडे
- बारोमास : जागतिकीकरणाचे परिणाम टिपणारी प्रातिनिधिक ग्रामीण कलाकृती ........................................ २०२
  प्रा. डॉ. प्रदीप राऊत
- व्यंकटेश माडगूळकर : ग्रामीण विद्यार्थ्यांना संस्कारक्षम बनविणारे शिक्षक ........................................ २०९
  डॉ. विष्णू नामदेव लांडे
- कोरोनोत्तर ग्रामीण साहित्य ........................................ २१३
  नरेश कृ. महाजन
- ग्रामीण, विदर्भातील लोकनायक बापूजी अणे : ऐतिहासिक व्यक्तिमत्त्व ........................................ २१७
  प्रा. डॉ. संदिप व्हि. भुरले
- ग्रामीण सार्वजनिक ग्रंथालयामध्ये माहिती साक्षरता कार्यक्रम काळाची गरज ........................................ २२४
  आर. जी. बाहेती
- तहान कादंबरीतील राघोजी शेवाळे यांचे व्यक्तिचित्र ........................................ २२९
  डॉ. अविनाश श. धोबे
- फ. म. शहाजिंदे यांच्या 'शेतकरी' दीर्घकाव्यातील विकल गावाचे चित्रण ........................................ २३५
  डॉ. बालाजी विठ्ठलराव डिगोळे
- कृषी जीवनाचे प्रत्ययकारी चित्रण करणारी कादंबरी– 'बारोमास' ........................................ २४१
  डॉ. भगवान जे. साबळे
- ग्रामीण जीवनाचे सामाजिक वास्तव : एक आढावा ........................................ २४६
  प्रा. डॉ. अपर्णा पाटील

संदर्भ ग्रंथसूची :

१. डॉ. सदानंद देशमुख- 'तहान', कॉन्टीनेन्टल प्रकाशन, पुणे, सुधारित आवृत्ती २०१७
२. डॉ. सदानंद देशमुख- 'बारोमास', कॉन्टीनेन्टल प्रकाशन, पुणे, द्वितिय आवृत्ती २००५
३. डॉ. सदानंद देशमुख- 'चारीमोरा', पॉप्युलर प्रकाशन, मुंबई
४. डॉ. आनंद यादव- 'ग्रामीण साहित्य स्वरूप आणि समस्या' मेहता पब्लिशिंग हाउस, पुणे, तृतिय आवृत्ती, जुलै १९९३
५. डॉ. कोत्तापल्ले नागनाथ- 'ग्रामीण साहित्य स्वरूप आणि शोध', मेहता प्रकाशन, पुणे, द्वितिय आवृत्ती १९९३
६. डॉ. ठाकूर रवींद्र- 'मराठी ग्रामीण कादंबरी', स्नेहवर्धक प्रकाशन, पुणे, द्वितिय आवृत्ती
७. डॉ. सार्वेकर कैलास- 'तहान : स्वरूप आणि समीक्षा' प्रशांत पब्लिकेशन्स, जळगाव, प्रथम आवृत्ती २००३
८. बांदिवडेकर चंद्रकांत- 'बारोमास विराट अनुभवाची महाकाव्यीय अभिव्यक्ती', अंतर्नाद, एप्रिल २००५
९. डॉ. येळवंडे लक्ष्मीकांत- 'सदानंद देशमुखांच्या कादंबऱ्या एक आकलन', स्मितांजली प्रकाशन, अहमदनगर, प्रथम आवृत्ती २००७

# ग्रामीण कादंबरीतील जननिष्ठ जाणिवांचा ज्वलंत व प्रभावी आविष्कार

**डॉ. पंढरी डोईफोडे**
मराठी विभाग प्रमुख
संत भगवान बाबा कला महा. विद्यालय, सिंदखेडराजा जि. बुलडाणा

ग्रामीण कादंबरीकाराचा ग्रामीण जीवनाशी प्रत्यक्ष सबंध असल्यामुळे ग्रामीणनिष्ठा, जनजाणिवा व प्रांजळपणे व्यक्त करू शकतात. ग्रामीण जीवन अनेक पदरी, बहुविध, बहुआयामी, गुंतागुंतीचे आणि बहुरूपी आहे. त्यामुळे ग्रामीण साहित्याच्या विकासाच्या शक्यता जास्त आहेत. ग्रामीण समाज हा संमिश्र समाज आहे. अनेक जातीधमाचे, उद्योग व्यवसाय करणारे, निरनिराळ्या भाषा बोलणारे, विभिन्न जीवननिष्ठा आणि श्रध्दा असलेले समाजघटक ग्रामीण भागात राहतात. त्यामुळे ग्रामीण साहित्य एखाद्याच महापुरूषाची बांधिलकी मानीत नाही. लेखकाची प्रखर जीवननिष्ठा आणि समाजनिष्ठा हीच खरी बांधिलकी असू शकते आणि यामुळेच ग्रामीण कादंबरीकार आपल्या भावना जननिष्ठ जाणिवेतून कादंबरीत आविष्कृत करतात. ग्रामीण साहित्य हे ग्रामीण जाणिवा व्यक्त करणारे ग्रामीण वास्तवाचे यथार्थ आणि कलात्मक दर्शन घडविणारे असल्यामुळे ते जीवनाकडे गांभीर्याने पाहणारे आहे.

वस्तुनिष्ठतेबरोबर अनुभवनिष्ठा विचारात घेऊनच ग्रामीण कादंबरीची निर्मिती होत आहे. ग्रामीण कादंबरीचा लेखक हा सामान्य माणूस आहे. त्यामुळे ग्रामजीवन आहे तसे अस्सल रूपात प्रतिबिंबित करण्याचा प्रयत्न तो करतो. त्याच्यावर सभोवतालच्या परिस्थितीचे होणारे संस्कार तो कादंबरीत अचूकपणे चित्रीत करतो. पांगुळवाडामध्ये लेखकाने आलेल्या वास्तव अनुभवांना शब्दरूप दिले आहे.

ग्रामीण लेखकाने वेदना अनुभवल्यामुळे त्यांच्या संवेदना जागृत होतात आणि त्यातून नवीन सृजकता निर्माण होते. पांगुळवाडामधील चारूशीला देशपांडे ही विकलांग अवस्था निर्माण झालेली स्त्री कादंबरीकारांनी कथानकाला गती देण्यासाठी चित्रीत केली नसून, वास्तवतेचा स्पर्श तिच्या चित्रणात आहे. चारूशीला देशपांडेसारख्या अनेक स्त्रीया समाजात वावरत आहेत. लौकिक जीवनामध्ये घडणाऱ्या घटना आणि साहित्यातून व्यक्त होणारे जीवनानुभव यांचा कार्यकारण सबंध असतोच, तो नाकारता येत नाही. ग्रामीण कादंबरीकार व सृजनशील वाचक कादंबरीचे अंतर्मुख होऊन चिंतन करीत आहेत. ही ग्रामीण साहित्याच्या दृष्टीने

उपयुक्त बाब आहे.

बाबासाहेब मुसळे यांच्या कादंबऱ्यांचा केंद्रबिंदू हा ग्रामीण शोषित माणूसच आहे. मुसळे हे तिसऱ्या पिढीचे ग्रामीण कादंबरीकार असल्यामुळे त्यांच्या कादंबऱ्यातून ग्रामीण वास्तवतेचा ज्वलंत अविष्कार होतो. ग्रामीण जीवन म्हणजे सुंदर स्वप्नांचा प्रदेश नाही. तर विविध प्रकारच्या शोषणाचे माहेरघर आहे, ही जाणिव अधिक मोठ्या प्रमाणात त्यांच्या कादंबऱ्यातून व्यक्त होत आहे. ग्रामीण साहित्याला अपेक्षित असणाऱ्या सर्व प्रश्नांना त्यांनी कादंबरीतून न्याय देण्याचा प्रयत्न केला आहे.

श्रीराम मुंदकर म्हणतात, खरे तर साहित्यातील सामाजिकतेचा किंवा सामाजिक बांधिलकीचा सांकेतिक पध्दतीने विचार होऊ नये. सामाजिकता आणि समाजनिष्ठा ही लेखकाच्या व्यक्तिमत्वाचाच अपरिहार्य भाग व्हावी लागते. अकृत्रिम तळमळ आणि मानवतेविषयी करूणा, कळवळा, शब्दाशब्दातून व्यक्त झाला पाहीजे.[१] मुसळे ग्रामीण भागातच राहत असल्यामुळे त्यांनी ग्रामीण भागाच्या समस्यांची परिस्थितीजन्य माहिती अनुभवलेली होती. त्यामुळेच हाल्या हाल्या दुधू दे मधील आनसाच्या समस्यांचे ज्वलंत चित्रण मुसळे यांनी केले आहे.

संवेदना आणि चिंतन ही एकात्म होऊन साहित्यात अवतरली तर साहित्य चैतन्यशील होते. याचे प्रत्यंतर सदानंद देशमुख यांच्या बारोमास मध्ये घडते. शिक्षणामुळे येणारे दुभंगलेपण एकनाथच्या चित्रणाने ते व्यक्त करतात. नोकरीसाठी पात्रतेबरोबरच लग्गेबाजी आणि डोनेशन हे महत्वाचे आहे. ते नसेल तर शिक्षण घेतलेल्या एकनाथ सारखी अवस्था सर्वांचीच होत आहे. एकनाथ केवळ त्याचा एक प्रतिनिधी आहे.

ग्रामीण कादंबरीच्या निर्मितीमागे जशी नवी वाङ्मयदृष्टी आहे, तसा एक सामाजिक संदर्भ आहे. सामाजिक जाणिवेशिवाय कलात्मकता संभवतच नाही. बारोमास मधील सुशिक्षीत अलका आणि सुरशिक्षित शेवंतामाय यांच्यातील संवाद ग्रामीण समाजाची, समाजातल्या स्त्रीची वैचारिकता प्रकट करणारा आहे. कादंबरीकारांना ग्रामीण समाजातची अनुभूती असल्याशिवाय जननिष्ठ जाणिवांची मांडणी करणे शक्य नसते. साहित्यनिर्मितीची बीजे जीवनातील वास्तवातच असतात. जीवनाच्या घडणीमध्ये प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे साहित्याचा काही ना काही वाटा असतो. समाज आणि संस्कृती यांच्या घडणीमधील साहित्याचा वाटा नाकारता येणार नाही. प्रत्यक्ष जीवनातील स्थिती-गतीची प्रतिबिंब साहित्यात उमटत असते. कारण साहित्याचा निर्माता साहित्यिक हाही समाजाचा एक घटक असतो.[२] ग्रामीण साहित्यिक इतरांच्या तुलनेत अधिक संवेदनशील व सृजनशील असतो. त्यामुळेच प्रत्यक्ष जीवनातील वास्तव आणि त्याही पलीकडील सामाजिक बदलते वास्तव मांडण्याचा तो प्रयत्न करतो. माझे करिअर मी निवडणार हे अलकाचे विचार त्याचेच द्योतक आहेत.

ग्रामीण कादंरीत नवा पायंडा पाडणारी ग्रामीण स्त्री सदानंद देशमुख यांनी तहान मध्ये चित्रित केली आहे. पुरूषी वर्चस्वाखाली राबता राबता सर्वच आयुष्य उद्ध्वस्त करणे रामकोरला शक्य नाही. सदानंद देशमुख यांनी तहान मध्ये ग्रामीण वास्तव रेखाटले. परंतु, त्याहीपलीकडे पुन्हा एकदा प्रतिभेच्या तिसऱ्या डोळ्याने बारकाईने पाहून स्वानुभवात ते कुठे कुठे, कसे कसे विखुरले आहे याचा शोध घेऊन आत्मनिष्ठेने रेखाटले आहे. ग्रामीण साहित्य कल्पनेपेक्षाही अधिक वास्तवाभिमुख झालेले आहे. ते स्वानुभवाशी, स्वप्रकृतीशी प्रामाणिक राहून लिहिले जाते.[३] पती परमेश्वर मानणाऱ्या संस्कृतीमध्ये रामकोरसारखी स्त्री पतीविरूध्द बंद करते आहे. ग्रामीण जीवनातला संघर्ष आता माणांसाशी आहे, याची जाण कादंबरीकारांना आलेली आहे. आजपावेतो लेखनाचा विचार केला तर आणखी नवनवीन अविष्कार ग्रामीण साहित्यातून येत आहे. साहित्यनिर्मितीकारांच्या जीवनानुभवांचा एक भाग म्हणूनच ते अवतरत आहे.

ग्रामीण स्त्रीची अस्मिता जागवणाऱ्या प्रतिमा इंगोले यांनी वर्तमान वास्तवाचा सजगजेने व कलात्मकतेने वेध घेण्याचा प्रयत्न बुढाई कादंबरीत केला आहे. स्वातंत्र्योत्तर बदलत्या काळात खेडी बदलत आहेत. खेड्यातील छोटा शेतकरी आणि ग्रामाचा गाभा असलेला मजूरवर्ग अपेक्षितच राहिला आहे. बदलत्या खेड्यातही त्याच्या घरादाराचा रोजगार चूकत नाही. उपासमार चुकत नाही. आणि मग असाच एक वर्ग कळत-नकळत शहराकडे धाव घेऊन आपला संसार उद्ध्वस्त करीत आहे. याचे चित्रण प्रतिभावंत असणाऱ्या लेखिकेने केले आहे. लेखकाची ग्रामीणतेविषयीची जाणीव साहित्यनिर्मितीमध्ये महत्वाची असते, म्हणून ग्रामीण हेतुकल्पना, कृषि संस्कृतीच्या केंद्रस्थानी जोडलेले अनुभव, ग्रामीणबोलीचा माध्यम म्हणून कलात्मक वापर आणि ग्रामीणतेचे संस्कार झालेले लेखाकाचे व्यक्तिमत्व यांचा एकरूपत्वातून ग्रामीण साहित्य निर्माण होते.[४] स्त्रीच्या अतिसंवेदनशीलतेला वास्तवरूपाने स्पर्श करण्याचे काम एक स्त्री म्हणून लेखिकेने केले आहे. गोकर्णाच्या चित्रणाने त्यांनी स्त्रीची बोली, शहरी व ग्रामीण स्वभावातील तफावत आणि त्यातूनच असमर्थ पुरूष असल्यावर स्त्रीचा होणारा सर्वनाश त्यांनी वास्तवरूपाने मांडलेला आहे. ग्रामीण संस्कृतीचे दर्शन घडविण्यासोबतच त्या संस्कृतीत राहणाऱ्या स्त्रीच्या नशिबी येणारे दु:खभोग हे गोकर्णा आणि सत्तूच्या रूपाने आविष्कृत केले आहे.

प्रतिमा इंगोले खेड्यात राहत असल्यामुळे व नवीन संदर्भ आत्मसात

करणाऱ्या असल्यामुळे गोकर्णासारख्या मजूरीकरणाऱ्या एका अभागी स्त्रीया ज्वलंत प्रश्न त्यांनी चित्रित केला आहे. ग्रामीण जीवनाच्या समस्या मांडताना कादंबरीकारांच्या प्रतिभेच्या कक्षा रुंदावलेल्या असणे गरजेचे आहे. ग्रामीण भागात आणि ग्रामीण भागातील सर्व सामाजिक स्तरांत शिक्षण पोहोचल्यामुळे सुशिक्षित ग्रामीण तरूणांच्यामध्ये एक नवी जागृती निर्माण झाली आहे... प्रत्यक्ष जीवनात त्यांना दिसणारे, जाणवणारे ग्रामीण विश्व ते आपल्या साहित्यातून साकार करीत आहेत.[५] समाजात जे घडत आहे त्यापासून नवीन प्रतिभा असणारा कादंबरीकार अलिप्त राहू शकत नाही. परिस्थितीशी आणि ग्रामीण संस्कृतीशी नाळ जोडलेली असल्यामुळे नवीन समस्यांचा उल्लेख तो आपल्या साहित्यात करतो.

ग्रामीण कादंबरीतून खेड्यांच्या विविध जीवन-प्रेरणांचा आविष्कार होत आहे. ग्रामीण भागातील तरूण वाचकवर्गालाही नागर साहित्यांपेक्षा ग्रामीण साहित्य अधिक जवळचे वाटप आहे. ग्रामीण कादंबरीतून सामाजिक वास्तववाद अविष्कृत होत आहे. पण त्याहीपेक्षा ग्रामीण कादंबरीला वास्तववादापुढे पाऊल टाकावे लागत आहे. पांगुळवाडा, बारोमास, पाटीलकी, वारूळ आणि पखाल या कादंबरीत त्याचे दर्शन घडते आहे. डॉ. आनंद यादव म्हणतात, ग्रामीण साहित्याने सतत सामाजिक, वास्तववादी राहणे आणि पुन्हा एका आवर्तात सापडण्यासारखे आहे. सामाजिक वास्तववादाच्या पलीकडे त्याने जाण्याची सतत झेप घेत राहण्याची गरज आहे.[६] आनंद यादव यांच्या विचाराला काही कादंबरीकारांनी न्याय देण्याचा पुरेपुर प्रयत्न केला आहे, असे दिसते.

ग्रामीण कादंबरीच्या माध्यमातून ग्रामीण जीवन कादंबरीकारांच्या आवाक्यात आलेले आहे. खेड्यातील स्त्रीचे दुःख मांडण्यासोबत बदलती स्त्री जननिष्ठ जाणिवेतून कादंबरीकार मांडत आहे. ग्रामीण भागातील सुशिक्षितांनी बेकारी, शेतकऱ्यांच्या आत्महत्या, हुंडा पध्दती, पुरूषी वर्चस्वाखाली सतत दबून राहणाऱ्या स्त्रीचा प्रतिकार, आदिवासींचे राजकीय प्रश्न, अशा ज्वलंत विषयांवर ग्रामीण कादंबरीकार भाष्य करतात आणि त्याचबरोबर त्यांच्या समस्या आणि त्यावरील उपाय निष्ठावंत मांडण्याचा वास्तवादी प्रयत्न त्यांनी केलेला आहे. ग्रामीण वाङ्मय म्हणजे अनुभूतीच्या अपरिहार्य आविष्कारातून आकारास आलेले जीवन होय.[७] असे आनंद यादव म्हणतात. त्याचप्रमाणे प्रत्यक्ष भोगलेले, अनुभवलेले वास्तवचित्रण ग्रामीण कादंबऱ्यात येत आहे. ते वास्तववादी नसले तरी काल्पनिक तर नाहीच. वास्तवाशी संवाद साधणारे मात्र जरूर आहे. वास्तवतेला शब्दांचे रूप त्यांनी दिलेले आहे, असे आपल्या लक्षात येते.

**संदर्भ ग्रंथसूची :**


१. डॉ. श्रीराम गुंदेकर, ग्रामीण साहित्य : प्रेरणा आणि प्रयोजन, दिलीपराज प्रकाशन पुणे, प्रथमावृत्ती, १९९९
२. डॉ. वासुदेव मुलाटे, ग्रामीण साहित्य : चिंतन आणि चर्चा, स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद प्रथमावृत्ती २००५
३. डॉ. किशोर सानप, मराठी कादंबरी : नव्या दिशा, निर्मळ प्रकाशन नांदेड, प्रथमावृत्ती २००५
४. मोहन पाटील, ग्रामीण साहित्य आणि संस्कृती, स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद प्रथमावृत्ती २००२